माध्यमिक शाळांमध्ये इंग्रजी अध्ययन – अध्यापनात बहुकौशल्य दृष्टीकोनाची (Multi Skill Approach) परिणामकारकता

पीएच.डी. शिक्षणशास्त्र या पदवीसाठी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात सादर केलेला संशोधन आराखडा

संशोधक

सौ.अर्चना दिलीपराव देशमुख

मार्गदर्शक

डॉ.श्री विवेक इनामदार

प्राचार्य स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रामाबाद
ता.मुखेड जि.नांदेड

अभ्यास केंद्र

शिक्षण शास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

2022

अनुक्रमणिका

अ.क्र.	शिर्षक	पृष्ठ क्रं.
१)	प्रस्तावना	०३
२)	संशोधन समस्येची गरज	०५
३)	संशोधन समस्येचे महत्व	०६
४)	समस्या विधान	०८
५)	समस्या विधानातील महत्वाच्या शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या	०८
६)	गृहितके	०९
७)	उद्दिष्ट्ये	१०
८)	संशोधन व्याप्ती	११
९)	संशोधन मर्यादा	११
१०)	संशोधन पध्दती	११
११)	संशोधन साधणे	१२
१२)	सांख्यिकिय परिमाण	१२
१३)	न्यादर्श निवड	१२
१४)	निष्कर्ष	१३
१५)	वेळापत्रक	१४
१६)	अंदाजपत्रक	१४
१७)	संदर्भसुची	१५

(Synopsis)

१) प्रास्ताविक :

भाषा हे एक अभिव्यक्तीचे साधन आहे. विचारांची देवाण घेवाण करण्याचे प्रभावी माध्यम आहे, म्हणूनच भाषा समृध्द असणे हे एकदम निकडीचे असते. मूल जन्मल्यापासून त्याच्या मातृभाषेशी जुळलेले असते व त्यातूनच तो बोलायला शिकतो परंतू जेंव्हा तो शिक्षणासाठी शाळेत जातो त्यास मातृभाषेसोबतच इतरही भाषा शिकविल्या जातात, आणि म्हणून मातृभाषे सोबतच इतर भाषा शिकतांना मुलास विशेष प्रयत्न करावे लागतात.

वाढत्या इंग्रजीचे महत्व पाहुन व त्यांच्या गरजेमुळे महाराष्ट्र शासनाने २००० या शैक्षणीक वर्षापासून '१ ली इयत्ता पासूनच इंग्रजी' विषय अध्यापनात / अभ्यासक्रमात समावेशित केला आहे. महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य आहे, ज्याने इयत्ता १ ली पासून इंग्रजी विषय शालेय अभ्यासक्रमात अंतर्भुत केला आहे. बदलत्या काळाची गरज व पालकांचा इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे वाढता कल पाहून हा निर्णय राज्यशासनाने घेतला. मातृभाषा ही तर अत्यंत महत्वाची आहेच पण त्या सोबतच इंग्रजी संभाषण व शिक्षण ही वैश्विक मागणी असल्यामुळे पालक व विद्यार्थ्यांचा

इंग्रजी शिक्षणावर भर वाढता आहे. १ ली पासून इंग्रजी या धोरणातंर्गत विविध प्रशिक्षणे देखील घेण्यात आली आहेत.

आज २१ वर्षानंतर या निर्णयामुळे जिल्हा परिषदा शाळांच्या अध्ययन अध्यापनात बराच मोठा बदल झाला आहे. परंतु सर्वच उद्दिष्टे प्राप्त झाली असे म्हणता येणार नाही. प्राथमिक स्तरावर थोडी फार इंग्रजीची ओळख असली तरी माध्यमिक (९वी, १०वी) स्तरावर या विषयाच्या संदर्भाने किती उद्दिष्ट प्राप्ती झाली हे ही लक्षात घेणे आवश्यक आहे. व त्याच बरोबर माध्यमिक स्तरावर बहुकौशल्य दृष्टीकोनाची अध्यापनात परिणामकारकता तपासणे हे ही क्रमप्राप्त आहे.

म्हणून ग्रामीण भागातील व शहरी भागातील जेवढ्या जिल्हा परिषद माध्यमिक शाळा आहेत त्या मध्ये या बाबतची परिणामकता विचारात घेणे आवश्यक ठरते.

## २)	संशोधन समस्येची गरज :-

अन्वये ६ ते १४ वयोवर्ष गटातील RTE Act २००९ कलम १६ विद्यार्थ्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण प्राप्त करुन देणे अनिवार्य केले आहे. त्यातंर्गत इंग्रजी विषयाचे वाढते महत्व लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य शासनाने वर्ष २००० पासून इंग्रजीचा इयत्ता १ ली पासून अभ्यासक्रमात समावेश केला आहे. त्यासाठी इंग्रजी विषयाची चार भाषिक कौशल्यांचा विकास (LSRW) करण्यासाठी आनंददायी व कृतीयुक्त, विद्यायुक्त, विद्यार्थी केंद्रीत शिक्षणावर भर देण्यात आला आहे. श्रवण, भाषण, संभाषण, वाचन व लेखन या चारही भाषिक कौशल्यांचा विकास त्या - इयत्तांमध्ये होणे आवश्यक आहे.

तथापी, काही सामाजिक, भौगोलिक व शालेय स्तरावरच्या विविध अडचणीमुळे हे उद्दिष्टे पुर्णताः प्राप्त होण्या मध्ये काही समस्या येतात. परिणामी मूल जेंव्हा (१ ली ते ४ थी) शिक्षणातून उच्च प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाच्या प्रवाहात येते तेंव्हा त्याच्या बऱ्याच संकल्पना अस्पष्ट असतात आणि त्याचा परिणाम त्याच्या पुढील कौशल्य संपादनावर होत असतो.

त्यासाठी विशेषतः नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण भागात इंग्रजीच्या अध्ययन व अध्यापनात काय अडचणी, समस्या येतात, भाषिक कौशल्ये

आत्मसात करतांना नेमक्या येणाऱ्या अडचणी समजून घेणे व त्याचा चिकित्सक अभ्यास करणे अतिशय जिकरीचे आहे.

त्यासाठी इंग्रजी अध्यापनात माध्यमिक स्तरावर बहुकौशल्य दृष्टीकोनाच्या (Multi Skill Approach) वापराची परिणामकारकता जाणून घेणे महत्वाचे ठरते.

३) संशोधन समस्येचे महत्व :

इंग्रजी अध्ययन ही एक काळाची किंबहुना वैश्विक गरज सध्या निर्माण झाली आहे. या स्पर्धेच्या युगात भक्कम उभा राहण्यासाठी इंग्रजी विषयाचे ज्ञान अनिवार्य झाले आहे. त्यासाठी इयत्ता १ ली पासून इंग्रजी विषयाचे शिक्षण राज्यशासनाने सुरु केले असले तरी, प्रत्यक्षात अमलबजावणी करतांना उद्दिष्ट प्राप्तीकडे यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी ज्या अडचणी येतात त्या समस्यांची उकल होणे आवश्यक आहे.

आनंददायी व कृतीयुक्त इंग्रजी अध्यापन व अध्ययन ही संकल्पना मुला सोबत प्रत्यक्ष उतरवितांना शिक्षकांना व विद्यार्थ्यांना अनेक अडचणी येतात. ज्या अडचणी वेळीच दूर करुन भाषेची चार भाषिक कौशल्ये विकास हा त्या-त्या इयत्ता मध्ये झालाच पाहिजे. ज्यांना व्याकरणात्मक दृष्टीने

इंग्रजी कळणे त्याचा दैनंदिन संभाषणात आत्मविश्वासपुर्वक उपयोजन करणे महत्वाचे आहे. विद्यार्थ्यांच्या मनातून विशेषतः (ग्रामीण भागातील विद्यार्थी) इंग्रजी विषयाची भिती काढून टाकण्यासाठी शिक्षकांसोबत पालक विद्यार्थी यांनाही तेवढीच मेहनत घ्यावी लागते.

त्यासाठी प्रत्यक्ष शाळेत या माध्यमिक विद्यार्थ्यामध्ये ही भाषीक कौशल्ये रुजवितांना अध्यापकांना शालेय स्तरावर येणाऱ्या शैक्षणिक समस्या, विद्यार्थ्यांचा प्रतिसाद इत्यादी कारणांचा चिकित्सक अभ्यास गरजेचे ठरते. तसेच त्यांच्या इंग्रजी अध्यापनात बहुकौशल्य दृष्टीकोनाचे परिणामकारकता तपासणे आवश्यक ठरते.

या समस्येव्दारे जिल्हा परिषद शाळेतील मराठी माध्यमाचे मूल इंग्रजी आत्मविश्वासनाने बोलण्यात का कमी पडते? इंग्रजी शाळांसारखेच अध्ययन अनुभव मुलांना मराठी माध्यमांच्या शाळा देतांना काय मर्यादा येतात, त्यांचा सर्वांगिण दृष्टीने विचार करण्यास व त्यावर उपाय शोधण्यास ही संशोधन समस्या नक्कीच मदत करणारी ठरेल.

४) समस्या विधान :

माध्यमिक शाळांमध्ये इंग्रजी अध्यापनात बहुकौशल्य दृष्टीकोनाच्या (Multi Skill Approach) वापराची परिणामकारकता.

५) समस्या विधानातील महत्वांच्या शब्दांच्या कार्यात्मक व्याख्या :

➢ **जिल्हा परिषद** :

जिल्हा पातळीवर ग्रामीण जनतेला नागरी सुखसोयी पुरविणारी व विकास कार्यक्रमात भाग घेणारी महाराष्ट्रातील एक अधिकृत महत्वपूर्ण संस्था

➢ **माध्यमिक** :

इयत्ता ९ वी ते १० वी चे वर्ग माध्यमिक या संकल्पनेत समावेशी.

➢ **अध्यापन** :

विशिष्ट उद्दिष्टप्राप्तीसाठी देण्यात आलेले अध्ययन अनुभव.

➢ **बहुकौशल्य दृष्टीकोन (Multi Skill Approach)** :

एक प्रभावी अध्यापन दृष्टीकोन जो विविध कौशल्यांच्या विकासावर भर देतो.

➢ **परिणामकारकता** :

एखाद्या विशिष्ट अध्यापन पध्दतीची अध्यापनातील प्रभाव व याचा फायदा.

६) गृहितके :

I. जिल्हा परिषद शाळेचा विद्यार्थी वर्ग हा जास्तीत जास्त ग्रामीण भागातून व आर्थीकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्यामुळे त्याचा शिक्षणावर आर्थीक परिस्थीतीचा परिणाम होतो.

II. सद्यस्थितीत माध्यमिक शाळांमध्ये अध्यापक वापरत असलेले अध्यापन कौशल्ये म्हणावी तेवढी पुरेशी नाही.

III. इंग्रजी विषय हा केवळ परिक्षेपुरता या अर्थाने शाळांमध्ये शिकला जात असल्यामुळे त्याच्या उद्दिष्टापर्यंत पोहोंचण्याचा प्रयत्न अपुरा पडतो.

IV. मुलांच्या अभ्यासातील प्रतिसादावर त्यांच्या घरच्या वातावरणाचा परिणाम पडतो. पालकवर्ग ग्रामीण भागातील असल्यामुळे मुलांच्या अभ्यासाच्या समस्या घरीच सोडवण्यात पालक अक्षम असतात.

V. बहुकौशल्य दृष्टीकोनाचा अध्यापनात वापर केल्यास विद्यार्थ्यांच्या इंग्रजी विषयाच्या आकलन क्षमतेत नक्कीच वाढ होईल.

VI. शालेय शिक्षणात दिवसातून १ तासिका इंग्रजी विषयाला भेटल्यामुळे शिक्षकांना त्या वेळेत म्हणावा तेवढा इंग्रजीचा सराव घेण्यास वेळ अपुरा पडतो.

VII. आकलन वाढविण्यासाठी विविध उपाय योजनांमुळे इंग्रजी भाषेमध्ये परिणामकारकरित्या वाढ होते.

७) उद्दिष्टे :-

१. जि.प. माध्यमिक शाळांमधील इयत्ता (९वी, १०वी) च्या विद्यार्थ्यांची सद्यस्थितीतील वाचन व लेखन (Reading & Writing) कौशल्ये कितपत विकसीत झाली आहेत हे तपासणे / जाणून घेणे.

२. सद्यस्थितीत जि. प. मध्यमिक शाळांमधील अध्यापकांच्या अध्यापनात वापरल्या जाणाऱ्या अध्यापन पध्दती व दृष्टीकोन (Approach) जाणून घेणे.

३. माध्यमिक वर्गात इंग्रजी अध्यापकास अध्यापन करतांना प्रत्यक्ष शाळेवर येणाऱ्या अडचणी / मर्यादा यांचा विचार करणे.

४. बहु कौशल्य दृष्टीकोनाचा (Multi Skill Approach) माध्यमिक स्तरावर अध्यापनात होणारा फायदा व परिणामकारकता तपासणे/जाणून घेणे

५. माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या पालकांची इंग्रजी विषयीची कल व आवड जाणून घेणे.

६. इंग्रजी अध्यापन परिणामकारक होण्यासाठी काही धोरणे व उपाययोजना सुचविणे.

८) संशोधन व्याप्ती :-

या संशोधनात नांदेड जिल्ह्यातील माध्यमिक शाळांपैकी १६ शाळांची निवड करण्यात आली आहे. १६ तालूक्यातून प्रत्येकी एक शाळा या प्रमाणे.

९) संशोधन मर्यादा :

- हे संशोधन नांदेड जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे.
- जिल्ह्यातील जि.प.च्या माध्यमिक शाळांपुरतेच मर्यादित आहे.
- जिल्ह्यातील १६ तालूक्यापुरतेच मर्यादित आहे.
- जि.प. माध्यमिक वर्गातील ९ वी व १० वी विद्यार्थ्यापुरतेच मर्यादित आहे.

१०) संशोधन पध्दती :

सर्वेक्षण पध्दती

११) संशोधन साधने :

१. प्रश्नावली

२. मतावली

३. निरिक्षण सुची

४. पडताळा चाचणी

१२) सांख्यिकिय परिमाण :

- शेकडेवारी

१३) न्यादर्श निवड :

१. नांदेड जिल्ह्यातील १६ तालूक्यातून प्रत्येकी एक शाळा या प्रमाणे ९ वी व १० वी वर्गातील काही विद्यार्थी

२. शाळांतील काही शिक्षक.

३. गावातील काही पालक.

१४) निष्कर्ष :

I. मुलांना त्यांच्या पुर्व प्राथमिक व प्राथमिक स्तरावर भाषिक कौशल्यावर भर दिल्यास त्यांना माध्यमिक स्तरावर अडचण जाणार नाही.

II. मुलांना Communicative Approach व्दारे शब्दसाठा वाढविण्याच्या दृष्टीने त्यांना अध्यापन केल्यास व जास्तीत जास्त इंग्रजीत संभाषणाची संधी दिल्यास ते आत्मविश्वासाने बोलू शकतील, मुलांच्या संभाषण कौशल्यात चांगलाच फरक पडेल.

III. प्रत्यक्ष वर्गात अध्यापन करतांना शिक्षकांनी विविध अध्यापक पध्दतीचा अवलंब करुन प्रत्यक्ष विद्यार्थी केंद्रीत शिक्षण दिल्यास नक्कीच फायदा होईल.

IV. ग्रामीण भागातील पालाकांनी थोडासा पाल्यांच्या इंग्रजी अध्ययनाकडे लक्ष दिल्यास पाल्य नक्कीच इंग्रजी विषयात रुची घेईल.

V. विविध दृकश्राव्य माध्यमांच्या वापराव्दारे व रंजक अध्ययन अनुभवाव्दारे विद्यार्थ्याच्या अडचणी सोडविण्यास अध्यापक समर्थ होतील.

VI. विद्यार्थी केंद्रीत वर्ग अध्यापनास व बहुकौशल्य दृष्टीकोनाच्या वापरास शिक्षकाने प्राधान्य दिल्यास विद्यार्थ्याच्या अध्ययनावर नक्कीच सकारात्मक परिणाम दिसेल.

१५) वेळापत्रक :

हे संशोधन कार्य वर्ष २०२१ ते २०२४ पर्यंत करण्यात येईल

अंदाजपत्रक

अ.क्र.	**तपशिल**	**कालावधी**
१.	संशोधन विषय निश्चित	जुलै-२०२१
२.	पुर्व संशोधन साहित्याचा आढावा	फेब्रू-२०२२
३.	संशोधन आराखडा	मार्च-२०२२
४.	माहिती संकलन साधन निर्मिती व प्रमाणिकरण करणे	सप्टें-२०२२
५.	माहितीचे संकलन	एप्रिल-२०२३
६.	माहितीचे विश्लेषण	आक्टो-२०२३
७.	अहवाल टंकलेखन	मे-२०२४

१६) संदर्भसूची (APA च्या पध्दतीनुसार)

१. आर. सर्वणपवा अय्यर (लिसनिंग क्रॉम्प्रहेशन स्ट्रेटेजिज ॲन्ड इन्स्ट्रक्शन अचिव्हमेंट इन सेकेंड लॅंग्वेज क्लासरुम) ८/१/२०१८

२. अखिलकुमार झा. (प्रमोटिंग लिर्निंग अँड ॲटॉनॉमी थ्रू सेल्फ असेसमेंट) १९/५/२०१७

३. गीता जांगीड, (अ होल लॅंग्वेज) २५/०७/२०१७

४. रीता घोष, (इंग्लिश लॅंग्वेज करीकुलम क्रिटीकल पॅडॉगॉजी प्रिस्पेक्टिव) २७/१२/२०१७

५. बी. एस. गोमाथी (इंटरनॅशनल जनरल ऑम्फ एज्यूकेशन इनरिचिंग द स्किल ऑफ रुरल स्टुडन्स विथ इफेक्टिव टिचिंग मेथड्स)

६. अमृतराज के, (बायलॅंग्वल एज्युकेशन अँन्ड टिचिंग इंग्लिश ॲज सेकंड लॅंग्वेज, इन इंडिया, केस स्टडी ऑफ केंद्रिय विद्यायल) २१/८/२०१८

७. सुनिल कुमार, (प्रमोटिंग प्रोफेशनल डेव्हलपमेंट ऑफ टिचर्स इंग्लिश टुडवर्डस हॉस्टीलिक अप्रोच) ३०/१/२०१७

८. फहमिदा शेख (टेस्टींग अँड इव्हॅल्यूएशन ऑफ डेव्हलपमेंट ऑफ मल्टी स्कील्स ऑफ इंग्लीश लॅंग्वेज ॲट प्रायमरी लेवल ईन बिड डिस्ट्रीक्ट) २०१४.

संशोधक

सौ.अर्चना दिलीपराव देशमुख

मार्गदर्शक

डॉ.श्री विवेक इनामदार

प्राचार्य स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मुक्रामाबाद ता.मुखेड जि.नांदेड